भारतीय रिज़र्व बैंक
RESERVE BANK OF INDIA
www.rbi.org.in

आरबीआय/2016-2017/79

एफआयडीडी सीओ.प्लान.सीओ.बीसी.क्र.17/04.09.001/2016-17 ऑक्टोबर 6, 2016

अध्यक्ष/व्यवस्थापकीय संचालक/मुख्य कार्यकारी अधिकारी
(सर्व अनुसूचित वाणिज्य बँका) (प्रादेशिक ग्रामीण बँका सोडून)

महोदय/महोदया,

**प्राधान्य क्षेत्रातील कर्जे - सुधारित अहवाल प्रणाली**

आमचे परिपत्रक एफआयडीडी सीओ.प्लान.बीसी.54/04.09.01/2014-15 दिनांक, एप्रिल 23, 2015 अन्वये प्राधान्य क्षेत्रासाठीची मार्गदर्शक तत्वे सुधारित करण्यात आली होती. त्यानुसार, प्राधान्य क्षेत्रातील कर्जांचे तिमाही व वार्षिक अहवाल पाठविण्यासाठीचे नमुनेही परिपत्रक एफआयडीडी सीओ.प्लान.बीसी.क्र.58/04.09.001/2014-15 दिनांक, जून 11, 2015 अन्वये देण्यात आले होते.

(2) पुनरावलोकन केल्यानंतर, प्राधान्य क्षेत्रातील कर्जाचे तिमाही व वार्षिक अहवाल पाठविण्याचे नमुनेही सुधारित करण्यात आले. ह्यासाठी बँकांना विनंती करण्यात येत आहे की, त्यांनी प्राधान्य क्षेत्रातील अग्रिम राशींवरील माहिती सोबत जोडलेल्या सुधारित नमुन्यांत पाठवावी. ही सुधारित तिमाही व वार्षिक विवरणपत्रे, अनुक्रमे तिमाहीची अखेर झाल्याच्या तारखेपासून 15 दिवसांच्या आत व वित्तीय वर्षाची अखेर झाल्याच्या तारखेपासून एक महिन्याच्या आत, भारतीय रिझर्व बँक, वित्तीय समावेशन व विकास विभाग सांख्यिकी विभाग, केंद्रीय कार्यालय, 3 रा मजला, अमर बिल्डिंग, फोर्ट, मुंबई - 400 001 ह्यांच्याकडे पाठवावीत.

(3) ह्याशिवाय बँकांना सांगण्यात येते की, त्यांनी, जून 2016 व ऑक्टोबर 2016 अखेरीस समाप्त होणा-या तिमाहींसाठीचे अहवाल, केवळ सुधारित नमुन्यांमध्येच, ऑक्टोबर 21, 2016 पर्यंत पाठवावेत,

आपला
(ए.उदगाता)
(प्रधान मुख्य महाव्यवस्थापक),
सोबत - वरील प्रमाणे.

वित्तीय समावेशन आणि विकास विभाग, केंद्रीय कायार्लय, 10वा मजला, केंद्रीय कार्यालय भवन, शहिद भगत सिंह मार्ग, पो.बा.सं.10014, मुंबई 400 001 टेलिफोन: 22-22601000 फॅक्स: 91-22-22621011/22619048 ईमेल: cgmincfidd@rbi.org.in

**सावधानतेचा इशारा : बँक खात्याचा तपशील पासवर्ड ह्यासारखी वैय्यक्तिक माहिती मागविण्याबाबत, आरबीआय, कधीही ईमेल्स, एसएमएस पाठवत नाही किंवा फोन ही करत नाही. आरबीआय, कोणाचा निधी ठेवून घेत नाही किंवा देऊ करत नाही. प्रकारच्या कोणत्याही ऑफर्सना प्रतिसाद देऊ नका.**